कोर्ट विधमान श्री.पी.व्ही.कापसे तहसीलदार कामठी यांचे कार्यालय

रा.मा.क्र.- 15 / एन.ए.पी.-34 /2007 –2008
मौजा – खैरी प.ह.न.-16
तहसील – कामठी

आदेश

(पारित दिनांक 10 जुलै 2008)

1)अर्जदार **श्री.विवेक विष्णुदत्त मिश्रा रा.मेकोसाबाग नागपूर** यांनी **मौजा खैरी प.ह.न.-16** येथील शेत **स.क्र.91/1 , 91/3 एकून आरजी 1.13, 0.13 हे.आर.भोग वर्ग -1 जमा रु.8.20 ,0.80 (12600 चौ.मी.)**प्रयोजनाकरिता **अकृषिक** करण्याची परवानगी मिळावी करिता अर्ज केल्यावरून सदरहू प्रकरण सुरु करण्यात आले.

2)अर्जदाराने अर्जासोबत शेतीचा 7/12 व नकाशा ,अधिकार अभिलेख जोडलेला शेतीचा 7/12 नुसार **मौजा – खैरी प.ह.न.16** तालुका कामठी ,जिल्हा नागपूर येथील **शेत सर्व्हे नंबर 91/1 , 91/3** कास्तकार **श्री.विवेक विष्णुदत्त मिश्रा रा.मेकोसाबाग नागपूर** यांचे नावाने आहे.

3)संबंधित प्रकरणात जाहीरनामा काढण्यात आलेला असून मौक्यावर व ग्रामपंचायत नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आला परंतु विहित तारखेच्या आत कोणाचेही उजर आक्षेप नाहीत.

4)संबंधित प्रकरणात ह्या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्रस्तु -1 / तह कामठी / कावी – क्यू /2007–2008 अन्वये नगर रचना विभाग नागपूर कार्यकारी अभियंता ,नागपूर सचिव ,सरपंच ग्रामपंचायत खैरी यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते परंतु विहित तारखेच्या आत कोणाचेही उजर आक्षेप नाहीत.

5) सचिव ,सरपंच ग्रामपंचायत खैरी यांनी ठराव पारित करून ह्या ठरावाची प्रत प्राप्त झालेली आहे त्यानुसार अर्जदारास परवानगी देण्यास हरकत नाही असे दर्शविले आहे.

तलाठी प.ह.न.16 यांनी अहवाल सादर केलेला असून तो सयुक्तीक आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करता तहसिलदार ,कामठी मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम **1966** चे कलम **44** व त्या अंतर्गत प्र.अ.म.(जमिनीच्या वापरात अकृषिक परवानगी)नियम **1966** चे कलम व नियम **4** व त्या अंतर्गत नियम व उपनियमातील शर्ती व अटीस अधीन राहून सर्व्हे न. **91/1 , 91/3 एकून आरजी 1.13 , 0.13 हे.आर. (12600 चौ.मी.)** शेत जमीन **निवासी** प्रयोजनाकरिता ***अकृषिक*** परवानगी देण्यात येत आहे.

शर्ती व अटी :-

1)जमिनीचा वापर 1 वर्षाचे आत **निवासी** प्रयोजनात आणणे आवश्यक राहील.

2)अर्जदारास हि परवानगी **निवासी** प्रयोजनाकरिता देण्यात आलेली आहे त्याशिवाय इतर उपयोगात आणता येणार नाही.

3) अर्जदारास हि जमीन इतर उपयोगात आणावयाची असल्यास त्यांनी मा.जिल्हाधिकारी नागपूर तसेच नगर रचना विभाग यांचे कडून परवानगी घेणे आवश्यक राहील.

4) अर्जदारास संबंधित जमीन शेतीची असल्यामुळे ती **निवासी** प्रयोजनाकरिता उपयोगात आणावयाची असल्यामुळे अकृषिक कराचे **3 पट रु.2646/-(रुपये दोन हजार सहाशे छेचाळीस फक्त)**हि परावर्तीत करावी अर्जदारास एकदा सरकारला जमा करावी लागेल.

5)शेतीची जमीन निवासी प्रयोजनाकरिता अकृषिक करण्याकरिता अकृषिक कर ,दर दर चौरस मीटरला **0.02 पैसे** प्रमाणे एकून **आरजी 1.13 , 0.13 हे.आर. (12600 चौ.मी.)**रुपये जमीन महसूल **882 /-** ग्रामपंचायत सेस जिल्हा परिषद सेस **4410/-** ही रक्कम सरकार ला जमा करणे आवश्यक राहील.

माझे सही व शिक्यानिशी आदेश देत आहे.

10/8

तहसिलदार कामठी

प्रतिलिपी:

1) **अर्जदार श्री. विवेक विष्णुदत्त मिश्रा रा.मेकोसाबाग नागपूर.**

2) वसुली बाकी नविस,शाखा तहसील कार्यालय कामठी यांना कार्यवाहीस अग्रेषित.

3) **तलाठी सा.क्र.16 मौजा- खैरी** यांना रेकार्डला नोंद घेण्याकरिता अग्रेषित.

4)तालुका निरीक्षक ,भूमिअभिलेख ,कामठी यांना रेकार्डला नोंद घेण्याकरिता अग्रेषित.

तहसिलदार कामठी

10/8

तहसिलदार कामठी